# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक-एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन दिनांक १९ ऑगस्ट, २०२०

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा पूर्व परीक्षा २०२०—**
**उमेदवारांना जिल्हा केंद्र निवडण्याची मुभा देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार महाराष्ट्र दुय्यम सेवा पूर्व परीक्षा २०२० चे आयोजन रविवार, दिनांक ३ मे, २०२० रोजी नियोजित होते. तथापि, कोरोना (COVID-१९) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व लॉकडाऊनचा कालावधी लक्षात घेवून दिनांक १७ जून, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार सदर परीक्षा **रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२०** रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे.

**२.** जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांनी त्यांच्या पसंतीचे जिल्हा केंद्र निवडले असले, तरी सदयस्थितीत महाराष्ट्रातील विविध शहरामधील कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावाची स्थिती, खेडयापाडयातील गरीब व होतकरु उमेदवारांना सध्याच्या परिस्थितीमध्ये अन्य जिल्ह्यांच्या परीक्षा केंद्रावर परीक्षेकरीता उपस्थित राहण्यासाठी उदभवणा-या संभाव्य अडचणी, लॉकडाऊनच्या पूर्वी पुण्यासह इतर प्रमुख शहरात आयोगासह इतर निवड प्राधिकरणांकडून घेतल्या जाणा-या विविध स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाकरीता वास्तव्य करीत असलेले उमेदवार कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे त्यांच्या मूळ गावी गेले असल्याची वस्तुस्थिती, सद्यस्थितीत प्रवासावरील व तात्पुरत्या वास्तव्यावरील निर्बंध इत्यादी बाबी लक्षात घेऊन आयोगामार्फत दिनांक ११ ऑक्टोबर, २०२० रोजी आयोजित विषयांकित परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या **सर्व** उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे जिल्हाकेंद्र निवडण्याची मुभा देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

**३.** आयोगाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवाराने निवडलेले जिल्हाकेंद्र रदद करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलदवारे **दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजी दुपारी १४.०० ते दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी २३.५९** वाजेपर्यंत उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे जिल्हाकेंद्र निवडण्याची संधी पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) संबंधित जिल्हयांमधील शाळा/महाविदयालयाच्या स्थानिक पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक जिल्हा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश द्यायवायाची कमाल क्षमता निश्चित करण्यात येत आहे. सदर क्षमता लक्षात घेवून "प्रथम येणा-यास प्राधान्य" (First Apply-First Allot) या तत्वानुसार जिल्हाकेंद्र निवडण्याची मुभा असेल. संबंधित जिल्हाकेंद्राची कमाल क्षमता संपुष्टात आल्यानंतर त्या जिल्हाकेंद्राची निवड उमेदवारांना करता येणार नाही.

(४) विहित कालावधीत जिल्हाकेंद्राची निवड न करणा-या उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेच्या त्यांच्या अर्जामधील कायमस्वरुपी रहिवासाचा पत्ता (Permanent Address) असलेल्या जिल्हयांतील परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादया जिल्हाकेंद्राची क्षमता संपुष्टात आल्यानंतर जिल्हाकेंद्राची निवड न करणा-या अथवा निवड करु न शकलेल्या उमेदवाराला आयोगाकडून उपलब्ध करुन देण्यात येणा-या जिल्हाकेंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

(६) नव्याने जिल्हा केंद्र निवडण्याकरीता सर्व उमेदवारांना त्यांच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल दूरध्वनी क्रमांकावर लघुसंदेशादवारे (एसएमएस) कळविण्यात येईल.

**४.** वरील व्यवस्थेप्रमाणे निवडण्यात आलेले जिल्हाकेंद्र बदलण्याची विनंती यापुढे कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही सबबीखाली मान्य करता येणार नाही.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग